सकाळ

# कबड्डीचा आजपासून थरार

## आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी ४८ संघ; मानांकनाचे विद्यापीठापुढे आव्हान

**कसबा बावडा, ता. २५ :** पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा सोमवारपासून (ता. २६) शिवाजी विद्यापीठात सुरू होत आहे.

गत स्पर्धेतील मानांकन परत मिळवणे हे यजमान शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंच्या पुढे आव्हान आहे.

उद्यापासून ६ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेसाठी पश्चिम भारतातील सुमारे ४८ संघ शिवाजी विद्यापीठात दाखल झाले आहेत. संघांची राहण्याची व्यवस्था कॅपिटाच्या विविध हॉस्टेलमध्ये केली आहे. त्याचबरोबर संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक यांची निवास व्यवस्था पाच बंगल्यात केली आहे.

शिवाजी विद्यापीठाचा मुलांचा संघ कबड्डीत नेहमी अव्वल असतो; पण सात-आठ वर्षे झाली या संघाला मानांकन राखण्यात अपयश आले आहे. या स्पर्धा शिवाजी विद्यापीठातच होत असल्यामुळे या संघाला चांगला खेळ करून मानांकन राखण्याची संधी आहे. राष्ट्रीय खेळाडू अक्षय निकम याच्या कर्णधारपदाखाली खेळणाऱ्या संघाची तयारी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडीगिरी यांनी करून घेतली आहे.



**कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी मॅटसह तयार असलेले मैदान.**

### शिवाजी विद्यापीठ संघाचा अक्षय निकम कर्णधार



**अक्षय निकम**

**कसबा बावडा :** पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ जाहीर झाला. अक्षय निकम (केएनपी कॉलेज, वाळवा) याची कर्णधारपदी निवड झाली. शिवाजी विद्यापीठाचा संघ असा : अक्षय निकम (केएनपी, वाळवा), राहुल वडार, सौरभ कुलकर्णी (दोघेही एबीपी, इस्लामपूर), ऋषिकेश देसाई, निखिल पाटील, सौरभ पाटील, अक्षय पाटील, साईनाथ कोंडुसकर (सर्व शाहू कॉलेज कोल्हापूर), रोहित पाटील (आसुर्ले पोर्ले), अनिकेत चव्हाण (वारणा महाविद्यालय), संकेत माने (नाईट कॉलेज इचलकरंजी), रोहन शिंगाडे (रेठरे महाविद्यालय), प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडीगिरी, संघ व्यवस्थापक डॉ. बाबासाहेब उलपे.

### विद्युतझोतात स्पर्धा रंगणार

**स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात सुसज्ज चार क्रीडांगणे तयार केली असून, स्पर्धाही सकाळी व सायंकाळच्या सत्रात होईल. सायंकाळी विद्युतझोताची व्यवस्था केली असल्याने हे सामने रात्री उशिरापर्यंत रंगतील. स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना व कोल्हापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्य आहे.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 NOV 2018
तरुण भारत

# पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा आजपासून...

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात आज सोमवार दि.२६ पासून पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. या स्पर्धा लोककला केंद्रातील चार मैदानावर दि.२६ ते ३० नोव्हेंबर या काळात होणार आहेत. स्पर्धेसाठी पश्चिम विभागातील ७ राज्यांतील सर्व विद्यापीठातून ६८ संघ सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेतील सामन्यांना सकाळी ८ वाजल्यापासून सुरूवात होणार आहे. दररोज सामने सकाळी ८ ते १२ या वेळेत होणार असून यानंतर दुपारच्या सत्रातील सामने रात्री दहा वाजेपर्यंत होणार आहेत. रात्रीचे सामने प्रकाशझोतात होणार आहेत. या स्पर्धेतील विजेत्या ४ संघांची ऑल इंडिया कबड्डी स्पर्धेसाठी निवड होणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन विमान बिल्डींगशेजारील कुस्ती मैदान येथे दुपारी चार वाजता आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू शांताराम जाधव यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रिडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित राहणार आहेत.

**शिवाजी विद्यापीठात ३० नोव्हेंबर पर्यंत रंगणार स्पर्धा**

दरम्यान, पश्चिम विभागातील ६८ विद्यापीठ संघातील ८१६ खेळाडू व १३६ कोच, व्यवस्थापक व ५० पंच नेमले आहेत. या स्पर्धा मॅटवर होणार असल्याने लोककला केंद्रात चार मॅटींग मैदाने (कोर्ट) तयार करण्यात आली आहेत. तसेच दोन मॅटींग कोर्ट सरावासाठी उपलब्ध आहेत. या मैदानावर सकाळी आणि सायंकाळी अशा दोन सत्रात कब्बडी स्पर्धा होणार आहेत. प्रकाश झोतात सामने घेतले जाणार आहेत. पहिल्या फेरीतील सामने बाद पध्दतीने होतील व दुसऱ्या फेरीतील साखळी पध्दतीने होतील.

## आंतरविद्यापीठ (पुरुष गट) कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ जाहीर

**शिवाजी विद्यापीठाचा संघ :** कर्णधार अक्षय निकम (केएनपी कॉलेज, वाळवा), राहूल वडार, सौरभ कुलकर्णी (दोघेही एबीपी, इस्लामपूर), ऋषिकेश देसाई, निखिल पाटील, सौरभ पाटील, अक्षय पाटील, साईनाथ कोंडुसकर (सर्व शाहू कॉलेज, कोल्हापूर, रोहित पाटील (आसुर्ले-पोर्ले), अनिकेत चव्हाण (वारणा महाविद्यालय), संकेत माने (नाईट कॉलेज, इचलकरंजी), रोहन शिंगाडे (रेठरे महाविद्यालय).



कर्णधार अक्षय निकम

प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडिगिरी, संघ व्यवस्थापक डॉ. बाबासाहेब उलपे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आजपासून घुमणार 'कबड्डी'चा आवाज

## पश्चिम विभागीय स्पर्धा; परराज्यातील संघांचाही सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठामध्ये पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धा आज, सोमवारपासून सुरु होणार आहे. महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश आणि राजस्थानमधील ६८ संघांमध्ये स्पर्धेचा थरार रंगणार आहे. यजमानपदाची जबाबदारी असणाऱ्या शिवाजी विद्यापीठात स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजतर्फे (एआययू) आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन सोमवारी दुपारी चार वाजता 'ओपन एअर थिएटर'मध्ये कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू शांताराम जाधव यांच्या हस्ते होणार आहे. यापूर्वी सकाळी आठ ते ११ या वेळेत तीन सामने होणार आहेत. स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थानमधील ६८ विद्यापीठांचे संघ असणार आहेत. कोल्हापूर जिल्हा कबड्डी संघटनेचे ४० सामना अधिकारी नियुक्त केले असून, स्पर्धेची तयारी पूर्ण झाल्याचे विद्यापीठाचे क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी सांगितले. दरम्यान, विद्यापीठात रविवारी लोककला केंद्रात मॅटिंग कोर्ट तयार करण्याचे काम जिल्हा कबड्डी संघटनेचे बाबासाहेब उलपे, बाळासाहेब बनगे, रुपेश जाधव, कुबेर पाटील, संभाजी गावडे, रमजान देसाई यांनी केले. स्पर्धेच्या ठिकाणी एक हजार आसन क्षमतेची प्रेक्षक गॅलरी आहे.

### स्पर्धा होणार अशी

सकाळी आठ ते ११ आणि दुपारी चार ते सायंकाळी सात या वेळेत प्रत्येकी ४० मिनिटांचे सामने होणार आहेत. 'ए', 'बी', 'सी' आणि 'डी' या चार गटांमध्ये संघांची विभागणी केली आहे. बाद फेरीनंतर साखळी फेरीतील सामने होतील. स्पर्धेचा समारोप शुक्रवारी होणार आहे.

### स्पर्धा दृष्टिक्षेपात

- संघांचा सहभाग : ६८
- सहभागी खेळाडू : ८१६
- प्रशिक्षक, व्यवस्थापक : १३६
- पंच : ५०

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा कबड्डी संघ जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ जाहीर झाला. या संघाच्या कर्णधारपदी वाळवा (जि. सांगली) येथील केएनपी कॉलेजच्या अक्षय निकम याची निवड झाली.

अन्य संघ असा : राहुल वडार, सौरभ कुलकर्णी (एबीपी कॉलेज, इस्लामपूर), ऋषिकेश देसाई, निखिल पाटील, सौरभ पाटील, अक्षय पाटील, साईनाथ कोंडुसकर (शाहू कॉलेज कोल्हापूर), रोहित पाटील, अनिकेत चव्हाण (वारणा महाविद्यालय), संकेत माने, रोहन शिंगाड, डॉ. रमेश भेंडीगिरी (प्रशिक्षक), डॉ. बाबासाहेब उलपे (संघ व्यवस्थापक)

सकाळ

# विद्यार्थ्यांना संशोधनास साहाय्य

## डॉ. देवानंद शिंदे; अर्थसाहाय्य देणारे देशातील पहिलेच विद्यापीठ

कोल्हापूर, ता. २५ : 'शिवाजी विद्यापीठाने संशोधन क्षेत्रातही स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. पदवी अभ्यासक्रमापासूनच विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी प्राप्त व्हावी; यासाठी 'रीसर्च सेनसेटनायझेशन स्किम' सुरू केली आहे. यामध्ये संशोधनासाठी महाविद्यालयांना शिवाजी विद्यापीठातर्फे १० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य केले जाणार आहे. याशिवाय अन्य योजनाही आहेत,' अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी डॉ. शिंदे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी पदवीपासूनच संशोधनाचा विचार केला पाहिजे. त्यामुळे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांचे संशोधनाच्या विषयातील ज्ञान वाढलेले असते. 'रीसर्च सेनसेटनायझेशन स्किम'चा हाच उद्देश आहे. यामध्ये सहभागी झालेल्या महाविद्यालयांना वर्षाला दहा हजार रुपये देण्यात येतील. यातून संशोधन करणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्याला त्यांनी अर्थसाहाय्य करावे. आतापर्यंत २५ महाविद्यालयांनी यासाठी प्रस्ताव पाठवले आहेत. पाच वर्षांपेक्षा कमी अनुभव असणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षकांना संशोधन करता यावे यासाठी 'रीसर्च इनिशियेशन्स स्कीम' सुरू झाली आहे. यामध्ये ९४ संशोधन प्रकल्प असून त्यांच्यावर ७५ लाख रुपये खर्च होणार आहे. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे संशोधन पूर्ण करण्यासाठी शिक्षण पूर्ण झाल्यावर सहा महिने विद्यापीठातील निवास, भोजन व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. तसेच दर महिन्याला ५ हजार रुपयांचे विद्यावेतनही मिळेल. नॅनो टेक्नॉलॉजी विभागातील १० विद्यार्थ्यांना यंदा या योजनेअंतर्गत अर्थसाहाय्य दिले जाणार आहे. अशा पद्धतीने संशोधनासाठी अर्थसाहाय्य उपलब्ध करून देणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ आहे.''



पत्रकार परिषदेला प्रकुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नानिनडेकर, उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे, व्ही. टी. पाटील उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात आज 'कँडल मार्च'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्रविद्या आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आज, सोमवारी सायंकाळी सहा वाजता कँडल मार्च काढण्यात येणार आहे. मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी कँडल मार्चचे आयोजन केले असून, यामध्ये विद्यापीठातील विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी होणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या वतीने पत्रकातून दिली.